# मुंबई विद्यापीठ

**विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निवडणूकीसाठी अध्यापक आणि विद्यापीठ अध्यापक मतदार संघाच्या दुरूस्ती मतदार यादी प्रसिध्द करणेबाबत.**

## जाहीर प्रकटन

**क्र.नि.वि./आय.सी.डी/२०२२-२३/४२७.**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम २८(२)(द)[28(2)(r)] अन्वये महाविद्यालयीन/परिसंस्थेतील १० अध्यापक व कलम २८(२)(ध)[28(2)(s)] अन्वये ०३ विद्यापीठ अध्यापक अधिसभेवर आणि कलम ३२(३)(छ)[32(3)(g)] नुसार ८ अध्यापक (प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधीत्व करणारे ०२ अध्यापक) विद्यापरिषदेवर निवडून देण्याची तरतुद आहे.

महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले सन २०१७ चे एकरूप परिनियम् क्र. १ मधील मुद्या क्र. ८ मधील तरतुदीनुसार तयार करण्यात आलेल्या अध्यापक अणि विद्यापीठ अध्यापक यांच्या तात्पुरती मतदार यादी तसेच अपात्र ठरलेल्या अर्जांच्या याद्या (कारणासहीत) **क्र.नि.वि./आय.सी.डी/२०२२-२३/३८१, दिनांक ०६ मार्च, २०२३** रोजी विद्यापीठाच्या https://mu.ac.in या संकेतस्थळावरील **Election 2022** या लिंकवर किंवा https://mu.eduapp.co.in या संकेतस्थळावर Voter List या सदराखाली (Tab) प्रसिध्द करण्यात आली होती. सदर तात्पुरत्या मतदार यादीवर दिनांक ११ मार्च, २०२३ पर्यंत आक्षेप मागविण्यात आले होते. त्यावरील आक्षेपांची नोंद घेऊन **दुरूस्त मतदार यादी** विद्यापीठाच्या https://mu.ac.in या संकेतस्थळावरील Election 2022 या लिंकवर किंवा https://mu.eduapp.co.in या संकेतस्थळावर Voter List या सदराखाली (Tab) प्रसिध्द करण्यात येत आहे. तसेच **दुरूस्ती मतदार यादी** प्रसिध्द झाल्याबद्दलची माहिती संक्षिप्त संदेश (SMS) द्वारे संबंधितांना कळविण्यात येत आहे.

पुढे आपणांस असे कळविण्यात येत आहे की, सदर दुरूस्ती मतदार यादीमध्ये वगळलेल्या किंवा चुकीच्या कोणत्याही नोंदी निदर्शनास आल्यास सदर नोंदीबाबत **गुरूवार, दि. ३० मार्च, २०२३ ते सोमवार, दि. ०३ एप्रिल, २०२३** पर्यंत स्पष्टीकरणासह विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने मा. कुलगुरूंना अपिलद्वारे निदर्शनास आणून द्याव्यात. ऑनलाईन पध्दती व्यतिरिक्त इतर कोणत्याही पध्दतीने मा.कुलगुरूंकडे अपील करू नये. इतर पध्दतीने मा.कुलगुरूंकडे अपील केल्यास त्याची नोंद घेतली जाणार नाही.

**सदर नोंदी मा. कुलगुरूंच्या निदर्शनास आणून देण्याची ऑनलाईन पध्दत खालीलप्रमाणे आहे.**

१. विद्यापीठाच्या https://mu.ac.in या संकेतस्थळावरील Election 2022 या लिंकवर किंवा https://mu.eduapp.co.in या संकेतस्थळावर जाऊन निवडणूकीच्या सॉफ्टवेअरमधील **Login/Registration** या **Tab** ला **Select** करावे.

२. संबंधीतांनी आपल्या **Login** मध्ये जाऊन तेथे उपलब्ध करून दिलेल्या **Add Grievance** या **Tab** वर **Click** करून तेथील रकान्यामध्ये सदर बाब स्पष्टीकरणासह नोंदवावी. सदर स्पष्टीकरणाबाबत असणारे कागदपत्रे दिलेल्या संबंधीत जागेवर अपलोड करावेत.

स्वाक्षरीत/-
(प्रा. सुनिल भिरुड)
प्रभारी कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी

दिनांक : २९ मार्च, २०२३
ठिकाण : मुंबई - ४०० ०३२.